१८/७/२० महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४

Email ID- secretary.stateboard@gmail.com or hodresearch.stateboard@gmail.com ☎020 25705000 / 171

इमेल द्वारे रवाना

क्र.रा.मं./प्रकाशन/शिक्षण संक्रमण/३२२२
पुणे -४११००४
दि.१५/०७/२०२०

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे, सर्व विभाग,

विषय : शिक्षण संक्रमण अंकाच्या मूल्यवाढीबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे "शिक्षण संक्रमण" हे मासिक दरमहा प्रकाशित केले जाते व प्रत्येक महिन्याच्या २६ तारखेस (अपवादात्मक परिस्थिती वगळता) पोस्टाच्या कार्यालयातून संपुर्ण राज्यात वर्गणिदारांना वितरित केले जाते.

सन २०१४ पासून अंकाची किंमत वाढविण्यात आलेली नाही. दरम्यानच्या काळात कागद व छपाईचे दर वाढले आहेत. तसेच सद्यस्थितीत एका माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयास प्रत्येक महिन्याचा एकच अंक वितरित होत असल्याने तो सर्व शिक्षक व संबंधित घटकांना वाचावयास मिळेलच, असे होत नाही. मोठ्या माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाबाबत ही बाब प्रकर्षाने जाणवते. त्याअनुषंगाने,

१) किरकोळ अंकाचे शुल्क रु.२०/- एवजी रु.२५/- करण्यात आलेले आहे.

२) अंकाचे वार्षिक शुल्क रु.२००/- एवजी रु.२५०/- करण्यात आलेले आहे.

३) मंडळाचे मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रत्येक महिन्याचे किमान २ अंकांचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

४) शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना दरवर्षी मंडळमान्यता / मान्यतावर्धित करण्याचे शुल्क भरताना शिक्षण संक्रमणच्या २ अंकांचे वार्षिक वर्गणीचे (रु.५००/-) शुल्क भरणे बंधनकारक/अनिवार्य करण्यात आलेले आहे.

तरी, शिक्षण संक्रमन अंकासंदर्भातील उपरोक्त प्रमाणे कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून (वर्गणीचा कालावधी माहे जुलै-२०२० ते जून-२०२१ धरावा) विभागीय मंडळांनी करावयाची आहे. तसेच वर्गणीदारांची वर्गणी स्वीकारतांनाच संपुर्ण पत्ता पिनकोडसह व मोबाईल क्रमांक घेण्यात यावा. राज्य मंडळाकडे वर्गणीदारांची यादी/माहिती पाठवितांना फक्त शाळा, क.महाविद्यालयाचा सांकेतांक न पाठविता नाव, अद्यायावत पत्ता, पिनकोडसह सर्व माहिती सविस्तर पाठवावी. सदर ठरावाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळास सादर करावा.

सोबत, का.प.ठरावाची प्रत जोडली आहे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ, पुणे -४११००४.

क्र. पुविमं/लेखा/शिक्षण संक्रमण
पुणे - 411005

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा/क० महाविद्यालये
पुणे/अहमदनगर/सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ, पुणे यांचे पत्राची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**Account Officer**
M.S.B. of S. & H.SEC. Educ.
Pune Divisional Board
Pune-411005.

स्थळ -पुणे
दि .06/08/20